सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ११८ | रविवार, दि. १८ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
१८ जानेवारी

- मदनमोहन पूंछी यांनी भारताचे २८ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
- नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन यांना भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान करण्यात आला.
- महादेव गोविंद रानडे न्यायमूर्ती यांचा जन्म.
- जगदीश शरण वर्मा भारताचे २७ वे सरन्यायाधीश यांचा जन्म.
- विनोद कांबळी भारतीय क्रिकेटपटू यांचा जन्म.
- वि. द. घाटे साहित्यिक, कवी आणि शिक्षणतज्ज्ञ यांचा जन्म.
- आत्माराम रावजी भट पद्मश्री, भारतीय कृतिशील विचारवंत यांचे निधन.
- हरिवंशराय बच्चन हिंदी साहित्यिक आणि कवी यांचे निधन.

# पालिकेच्या विविध समिती सभापतींची उद्या निवड

## नियोजन, विकास समिती सभापतिपदी प्रशांत निकम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेच्या विविध विषय समित्या सदस्यांची निवड करण्यात आली आहे. गुरुवार, दि. १५ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता क्रांती सूर्य महात्मा जोतिबा फुले सभागृहात याबाबत बैठक घेण्यात आली होती. प्रांताधिकारी मयूर भंगाळे पीठासन अधिकारी होते. उपनगराध्यक्ष प्रशांत निकम यांची नियोजन व विकास समिती सभापती निवड करण्यात आली आहे. विविध समिती सदस्यांची सख्या १२ निश्चित करण्यात आली आहे. सर्व समिती सभापतींची निवड आणि स्थायी समिती सभापती निवड सोमवार, दि. १९ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे.

सुरवातीला बैठकीत शिवसेना गटाकडून १० तर शहर विकास आघाडीकडून ११ सदस्यांची मागणी करण्यात आली होती. अपक्ष गट यांच्यात व गटनेत्यांमध्ये एकमत न झाल्याने पिठासन अधिकारी श्री. भंगाळे यांनी १९६५च्या कलमांन्वये १२ सदस्य निश्चित करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यानुसार शिवसेना गटाला ५, अमळनेर शहर विकास आघाडीला ४, अपक्षच्या गटाला २, तर दोन अपक्षांच्या गटाला १ असे सदस्य नामनिर्देशन करण्यात आले. यावेळी उपनगराध्यक्ष निकम यांना नियोजन व विकास समितीचे पदसिद्ध सभापती म्हणून नियुक्त करण्यात आले. पीठासन अधिकारी श्री. भंगाळे यांना मुख्याधिकारी गणेश शिंदे,




नायब तहसीलदार प्रशांत धमके, रवींद्र चव्हाण, विनोद पाटील, प्रमोद लटपटे यांनी कामकाजास मदत केली. पालिकेत तिन्ही गटाचे १२-१२ सदस्य निवडून आले आहेत. प्रत्येक समितीत देखील १० ऐवजी १२-१२ सदस्य घेण्यात आले आहेत.

### विविध समिती सदस्य असे

बांधकाम समिती सदस्य साहेबराव पवार, रुपाली शिवदे, मोहन सातपुते, सुयोग धनगर, पुष्पा पंकज भोई, सचिन कासार, शेख जुबेदाबी नसीरोद्दीन, जयश्री पाटील, सचिन बळवंत पाटील, कल्पना परदेशी, महेश देशमुख, प्रविण पाटील. शिक्षण समिती सदस्य शेख नाविद शे. मुशीरोद्दीन, पंकज चौधरी, सविता संदानशिव, सुवर्णा हटकर, अपूर्वा चौधरी, कविता राजपूत, अघुसाना मुक्तार खाटीक, सचिन पाटील, कल्पना परदेशी, प्रताप साळी, योगिता कापडणेकर. आरोग्य समिती सदस्य सविता संदानशिव, गुलाब पाटील, पंकज चौधरी, सुयोग धनगर, श्रीराम चौधरी, देवेंद्र कांबळे, शोभाबाई गढरे, नंदा संदानशिव, सचिन पाटील, रामकृष्ण पाटील, नीलिमा पाटील, प्रविण पाटील. पाणीपुरवठा समिती सदस्य कैलास पाटील, मौहन सातपुते, पंकज चौधरी, पुष्पा पंकज मोरे, सुयोग धनगर, देवेंद्र कांबळे, जयश्री पाटील, डॉ. डिगंबर महाले, विजय कहारु पाटील, नीलिमा पाटील, छाया पाटील, प्रवीण पाटील. नियोजन व विकास समिती सदस्य श्रीराम चौधरी, दीपक चौगुले, कल्पना शर्मा, पुष्पा पंकज भोई, गुलाब पाटील, शोभाबाई गढरे, सचिन कासार, नंदा संदानशिव, विजय कहारु पाटील, महेश देशमुख, प्रताप साळी, योगिता कापडणेकर. महिला व बाल कल्याण समिती सदस्य कल्पना शर्मा, पुष्पा पंकज भोई, रुपाली शिवदे, तडवी इर्शाद सुनिल, योगिता संदानशिव, कविता राजपूत, अफसाना मुक्तार खाटीक, नंदा संदानशिव, स्वाती परदेशी, छाया पाटील, योगिता कापडणेकर.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

### बालिका अत्याचार प्रकरण

# ढेकू खुर्दच्या दीपक भिलला २० वर्ष सश्रम कारावसाची शिक्षा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : अल्पवयीन मुलीच्या अत्याचारप्रकरणी तालुक्यातील ढेकू खुर्द येथील आरोपी दीपक नाना भिल (वय २६) यास २० वर्ष सश्रम कारावसाची शिक्षा न्यायालयाने ठोठावली आहे. तर्थ अति. सत्र जिल्हा न्यायाधीश एल. डी. गायकवाड यांनी शनिवार, दि. १७ जानेवारी रोजी हा महत्वपूर्ण निकाल दिला आहे.

खटल्याची पार्श्वभूमी अशी : आरोपी दीपक नाना भिल याने मुकबधीर असलेली अल्पवयीन मुलींवर विविध ठिकाणी वारंवार अत्याचार केला होता. यात पिडिता ५ महिन्यांची गर्भवती राहिली होती. याप्रकरणी पिडितेच्या वडिलांनी ३० जानेवारी २०२२मध्ये अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. तत्कालिन तपासाधिकारी पोलीस उपनिरीक्षक नरसिंह वाघ यांनी न्यायालयात दोषारोप दाखल केले होते. याप्रकरणी सरकार पक्षातर्फे ७ साक्षीदार तपासण्यात आले. पिडित मुलगी मूकबधीर असल्याने विशेष शिक्षक दुभाषिक म्हणून नेमण्यात आले होते. तीची व्हिडिओग्राफीद्वारे बंद दरवाजात तीची साक्ष नोंदविण्यात आली होती. सरकारी अभियोक्ता ॲड. किशोर बागूल यांनी प्रभावी युक्तीवाद केला होता. त्यामुळे सबळ पुराव्यांवरून आरोपी दीपक भिल याविरूद्ध गुन्हा सिद्ध झाला होता. त्यामुळे न्यायालयाने पोक्सो कायद्यांन्वये २० वर्ष सश्रम कारावास व १० हजा रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली आहे. त्यापैकी ७ हजार रुपये पिडितेस देण्याचे आदेश दिले आहेत. पोलीस उपनिरीक्षक उदयसिंग साळुंके, हवालदार पुरूषोत्तम वाल्डे, चोपडा ग्रामीण पोलीस ठाण्याचे हवालदार राहुल रणधीर, मारवड पोलीस ठाण्याचे हवालदार भरत ईशी, अडावद पोलीस ठाण्याचे हवालदार सतीश भोई यांनी पैरवी अधिकारी म्हणून कामकाज पाहिले.

## मानाची कुस्ती...



अमळनेर : मकर संक्रांतीला झालेल्या कुस्तीच्या दंगलीत मानाची कुस्ती लावताना मंगळ ग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष तथा नगरसेवक डॉ. डिगंबर महाले. शेजारी संजय पाटील, प्रताप साळी, बाळू पाटील, प्रताप शिंपी आदी.

## पंजाब बँकेचे एटीएम फोडण्याचा प्रयत्न अयशस्वी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगलमूर्ती चौकातील पंजाब बँकेचे एटीएम फोडण्याचा चोरट्यांनी प्रयत्न केला. मात्र, संकुलातील एका फ्लॅटधारकांच्या समयसुकतेने चोरट्यांचा डाव फसला आहे. ही घटनला शुक्रवार, दि. १६ जानेवारी रोजी पहाटे घडली. पिकअप व्हॅन घेऊन एक चोरटा एटीएम जवळ आल्यानंतर त्याने साखळदंड बांधून एटीएम मशीन ओढण्याचा प्रयत्न केला. यावेळी मशीन खाली पडल्याने मोठा आवाज झाला. हा आवाज ऐकून संकुलाच्या वर फ्लॅटमध्ये राहणारे एक कुटुंब जागे झाले. त्यांनी खिडकीतूनच कोण आहे ? असा जोरात आवाज दिल्याने चोरटा मशीन सोडून वाहनाने पसार झाला. ही घटना सकाळी उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. सीसीटीव्ही फुटेजही तपासण्यात आले. याबाबत बँकेतर्फे पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे.

## अमळनेरला आज विराट कुस्त्यांची दंगल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील जय हिंद व्यायामशाळा, राजे शिवाजी मित्र मंडळातर्फे रविवार, दि. १८ जानेवारी छत्रपती शिवाजी नगरात रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ६ या वेळात विराट कुस्त्यांची ओपन दंगल होणार आहे. आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होईल. याप्रसंगी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, हृदयरोतज्ज्ञ डॉ. संदीप जोशी, बाजार समितीचे सभापती अशोक पाटील, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, मुंदडा बिल्डर्सचे संचालक अमेश मुंदडा, विक्रांत पाटील, जीतू ठाकूर, प्रताप शिंपी, जीवन पवारआदी प्रमुख अतिथी असतील. कुस्ती दंगलीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# क्रांतीकारी शहिदांच्या वंशजांचा सन्मान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील धार येथे क्रांतीकारी शहीद परिवाराचे वंशज यांचा सन्मान सोहळा झाला. महामंडलेश्वर १००८ परम आर्दश वेद आचार्य संत हंसादनंद तिर्थजी व महामंडलेश्व देवश्वर तिर्थजी आदी उपस्थित होते.

यावेळी जगद्गुर संत तुकाराम महाराज यांचे ९वे वंशज अशोक मोरे देहुकर, शहिद सूकदेव यांचे वंशज अशोकजी थापर, हुतात्मा राजगुरू यांचे वंशज प्रशांतजी राजगुरू, अमर शहिद चंद्रशेखर आझाद यांचे वंशज अमितजी आझाद व नेहा आझादजी यांचा समावेश होता. याप्रसंगी हिंदुस्तान रिपब्लिकन आर्मीचे राज्य उपाध्यक्ष भागवताचार्य कमलेश कुलकर्णी, शशिकांत पाटील, गिरीश पाटील, आनंद चव्हाण, कौशल चोव्हाण, कुलदीप खोरे, संकेत मांडे, दर्शन लाड, सुमित जोशी, करण परदेशी, संजय पाटील यांच्यासह धार व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



अमळनेर : सन्मान सोहळ्यास उपस्थित अशोक मोरे, अशोकजी थापर, प्रशांतजी राजगुरू, अमितजी आझाद व नेहा आझाद.

# पाटीलगढीवासीय जपताहेत सण- उत्सवांची परंपरा

## मकरसंक्रांती उत्साहात; एकोप्याचे घडविले दर्शन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील भालेरावनगर भागातील पाटीलगढी परिसरातील रहिवासी एकोप्याने व गुण्यागोविंदाने सण-उत्सव, जयंती, पुण्यतिथी, धार्मिक व शैक्षणिक उपक्रम साजरे करण्यासाठी ओळखले जातात. सुख-दुःखात एकत्र येण्याची परंपरा येथे आजही जपली जात असून, हीच एकी या परिसराची खरी ओळख आहे.

मकरसंक्रांतीनिमित्त पार्श्वभूमीवर "तीळ- गूळ घ्या, गोड गोड बोला" या पारंपरिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पाटीलगढीतील सर्वांचे लाडके व्यक्तिमत्त्व, सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले डॉ. महेश पाटील (भूरा पाटील) जवखेडेकर यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार व स्नेहमेळाव्याचेही आयोजन करण्यात आले.



अमळनेर : भालेराव नगरातील पाटीलगढी भागात संक्रांतीनित्ति झालेल्या कार्यक्रमप्रसंगी डॉ. महेश पाटील यांचा सत्कार करताना पालिकेतील गटनेते महेश देशमुख. शेजारी उपस्थित परिसरातील नागरिक.

गीतगायनाच्या कार्यक्रमात इंजि. उज्वल पाटील, महेंद्र काटे, हरिचंद्र कटरे व रामचंद्र उपासनी यांनी सुमधुर गीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विजय पाटील व गोकुळ पाटील यांनी मनोगतातून डॉ. महेश पाटील यांच्या सामाजिक, वैद्यकीय व सेवाभावी कार्याचा गौरव केला. याप्रसंगी नगरसेवक महेश देशमुख, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील, मा. नायब तहसीलदार विलास पाटील, मुख्याध्यापक व्ही. ए. अनिल दुसाने, ॲड. दिनेश पाटील, ए. डी. पाटील, प्राचार्य एम. ए. पाटील, श्रीराम पाटील, सदाशिव पवार, अंगणवाडी कर्मचारी संघाचे रामकृष्ण पाटील, माजी जि. प. सदस्य संदीप पाटील, डॉ. गणेश पाटील, डॉ. लांबोळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय रनाळकर, कृषी अधिकारी दिनेश पाटील, दादाभाऊ पाटील, डॉ. संजय मुसळे, किशोर पाटील, इंजि. उज्वल पाटील, भूषण भांडारकर, अमोल कोठावदे, गंगाधर अहिरराव, चेतन साळुंखे, पराग पाटील आदी उपस्थित होते.



सक्सेस स्टोरी

# २८ लाख कमाने वाली सीए ने छोड़ी नौकरी

## शुरू किया अपना बिजनेस, अब सफलता चूम रही कदम, पढ़ें सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हाल के दिनों में हायर डिग्री पूरी करने के बाद भी नौकरी मिलना बहुत मुश्किल हो गया है। खासकर अगर आपको नौकरी मिल जाए लेकिन सैलरी कम हो, तो भी कई लोग उसी नौकरी में लगे रहते हैं। इसी सिलसिले में बेंगलुरु की एक सीए प्रोफेशनल महिला ने समाज के नियमों के खिलाफ जाकर एक जानी-मानी कंपनी में अपनी २८ लाख रुपये की सालाना सैलरी छोड़कर अपना खुद का बिजनेस शुरू किया है। अब वह एक कंपनी की मालिक बन गई हैं। उन्होंने इसे सोशल मीडिया पर शेयर किया और उनका यह सफर वायरल हो गया है।

### कौन हैं सीए मीनल गोयल? २८ लाख रुपये की नौकरी छोड़ बिजनेस का सपना देखा

बेंगलुरु में रहने वाली चार्टर्ड अकाउंटेंट मीनल गोयल केपीएमजी और डेलॉइट जैसी जानी-मानी कंपनियों में काम कर चुकी हैं। उन्हें भी सालाना २८ लाख रुपये सैलरी मिलती थी। इतनी आरामदायक लाइफ होने के बावजूद उनको जिंदगी में कुछ बड़ा करने की इच्छा रही, न कि सिर्फ तनख्वाह का इंतजार करने की। इसी इच्छा से प्रेरित होकर मीनल गोयल ने अपने ६ साल के अनुभव, स्टेबल सैलरी और भी बहुत कुछ के साथ अपने माता-पिता, दोस्तों और बाकी सभी की उम्मीदों को पार करते हुए अपना खुद का बिजनेस शुरू करने का फैसला किया।

### कब छोड़ी नौकरी?

नतीजतन मार्च २०२३ में नौकरी छोड़ने वाली मीनल गोयल ने अपना बिजनेस शुरू किया और कहती हैं कि पहले ६ महीने मुश्किल थे। जब उन्होंने शुरू किया तो उनकी सेविंग्स १२ लाख से ४ लाख हो गई थीं। करीब ५ दिनों तक उनके पास कोई इनकम नहीं थी। उन्हें याद है कि ऐसे भी दिन थे जब वह हर रात जागकर सोचती थीं कि क्या उनका फैसला सही था।

### एक फ्रीलांस प्रोजेक्ट ने दिया सपोर्ट

हालांकि उन्होंने हार नहीं मानी और उन्हें अनएकेडमी के साथ २५ हजार के एक छोटे से फ्रीलांस प्रोजेक्ट से सपोर्ट मिला। यह उनके लिए एक बड़ा मोड़ साबित हुआ। उस समय उनके लिए पैसा उतना मायने नहीं रखता था, जितना यह विश्वास कि कोई उन पर भरोसा कर रहा है। इस भरोसे ने उन्हें और भी हिम्मत दी। इस फ्रीलांस प्रोजेक्ट से मिली प्रेरणा से मीनल गोयल ने पीछे मुड़कर नहीं देखा और तेजी से आगे बढ़ीं। आज वे अपनी खुद की कंपनी चला रही हैं। उनकी ५ लोगों की टीम वाली कंपनी से वे हर महीने ५ लाख रुपये कमा रही हैं। इंडस्ट्री के उतार-चढ़ाव का अनुभव करने के बावजूद वह पक्के इरादे के साथ आगे बढ़ रही हैं।

### १०० करोड़ रुपये का बिजनेस शुरू करने की रेस में

मीनल ने अपनी यात्रा से सीखा है कि बिजनेस के लिए कभी भी पूरी तरह से तैयारी नहीं होती और न ही इसे शुरू करने के लिए एक निश्चित बचत की जरूरत होती है। जिन कंपनियों के साथ उन्होंने काम किया है, उनमें उनके कुछ पुराने कलीग कॉर्पोरेट लाइफ में एक और कदम आगे बढ़ाने की कोशिश कर रहे हैं। वहीं वह अकेली हैं जो १०० करोड़ रुपये का बिजनेस शुरू करने की रेस में हैं, जिसकी पूरी मालिक वह खुद हैं।

### नेटिजन्स उनकी हिम्मत की तारीफ कर रहे

उनकी पोस्ट अब सोशल मीडिया पर वायरल हो गई है। लोग उनके चुने हुए रास्ते और अपनी पक्की नौकरी छोड़ने और अपने कम्फर्ट जोन से बाहर निकलकर जो वह चाहती थीं, उसे पाने की उनकी हिम्मत की तारीफ कर रहे हैं। कई लोगों ने उनके सफर के बारे में बात की है और कहा है कि उनका २५००० रुपये का पहला चेक सच्ची एंटरप्रेन्योरशिप का सबूत है और शुरुआती इनकम से ज्यादा वैल्यूएशन जरूरी है। कुछ लोगों ने मीनल की ज्यादा सैलरी वाली नौकरी की सोच को पीछे छोड़ने, घटती सेविंग्स के प्रेशर का सामना करने, महीनों की अनिश्चितता को झेलने और हिम्मत से आगे बढ़ने के हौसले की भी तारीफ की है।


### लोगों के लिए मिसाल बनी मीनल

इस तरह आरामदायक जिंदगी को छोड़कर, जो है वही जिंदगी है, इसी में जी लो की सोच के साथ मीनल गोयल ने अनिश्चितता से डरे बिना, हिम्मत से कदम बढ़ाया और आज एक सफल उद्यमी बनकर यह साबित कर दिया है कि मनुष्य ठान ले तो कुछ भी संभव है। उनकी यह कहानी लोगों के दिलों को छू गई है और वह कई लोगों के लिए एक मिसाल बन गई हैं।




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेवणात दिसणारी हिरवीगार कोथिंबीर फक्त सजावटीसाठी वापरली जात नाही. ती आरोग्याचा खजिना आहे. कोथिंबीर खाल्ल्याने पचनशक्ती सुधारते, रक्त शुध्द होते आणि मूत्रासंबंधी त्रास कमी होतो. जर रोजच्या आहारात कोथिंबीर असली, तर आरोग्य चांगले राहणे हमखास ठरलेले आहे. कोथिंबीर सलाडमध्ये टाकली की त्याची चव दुप्पट होते. हिरवीगार चटणी बनवून खाताना जेवणातील मजाच वेगळी असते. कोथिंबीर भाजी, दाल, आमटी, सूप किंवा रायत्यामध्ये वापरू शकता. दिवसातून साधारण १५ ते २० पाने जरी खाल्ली, तरी शरीराला पुरेसे पोषण मिळते. कोथिंबीर सकाळी उपाशीपोटी चटणीच्या स्वरूपात खाल्ल्यास रक्त शुध्दीकरणात जास्त मदत होते. कोथिंबीर मूत्रवर्धक आहे. त्यामुळे शरीरातील अतिरिक्त पाणी आणि मीठ बाहेर टाकायला मदत करते. ज्यांना वारंवार सूज येते, लघवीसंबंधी त्रास होतो त्यांच्यासाठी ही औषधासारखी काम करते. यामध्ये असणारे नैसर्गिक घटक पचनक्रिया सुधारतात. अपचन, गॅस आणि पोटफुगीपासून आराम मिळतो. तसेच रक्तातील अशुध्दता कमी करून त्वचाही स्वच्छ व तजेलदार ठेवते.




## आरोग्यदायी कोथिंबीर

कोथिंबीरचा वापर जास्त करून जेवणासोबत करावा. सकाळी नाश्त्यासोबत हिरवी चटणी, दुपारच्या जेवणात सलाड, रात्रीच्या आमटीत वरून टाकलेली कोथिंबीर असा नियमित वापर सर्वांत चांगला आहे. दिवसातून साधारण एक मूठभर कोथिंबीर खाल्ल्यास पचन आणि मूत्रसंस्था दोन्ही तंदुरुस्त राहतात. मात्र अतिशय जास्त प्रमाणात सेवन केल्यास थोडासा त्रास होऊ शकतो. त्यामुळे संतुलित प्रमाणातच वापरणे योग्य. कोथिंबीर ही केवळ सजावटीची पाने नाहीत, तर आरोग्यासाठी वरदान आहेत. जेवणातील छोटीशी हिरवीगार सजावट आपले आरोग्य टिकविण्याचे मोठे काम करते. म्हणूनच रोजच्या आहारात कोथिंबीर जरूर वापरावी.

# स्वराज्याचे वारस : छत्रपती संभाजी महाराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

छत्रपती संभाजी महाराज यांचा राज्याभिषेक १६ जानेवारी १६८१ रोजी रायगड किल्ल्यावर मोठ्या थाटामाटात झाला. ज्यामध्ये ते स्वराज्याचे दुसरे छत्रपती बनले आणि त्यांनी स्वराज्याची धुरा यशस्वीपणे सांभाळली. शिवाजी महाराजांचे कार्य पुढे नेले आणि मुघलांविरुद्ध पराक्रमी लढा दिला. गेल्या १६ जानेवारी रोजी सर्वत्र छत्रपती संभाजी महाराज यांचा राज्याभिषेक दिन सोहळा सर्वत्र साजरा झाला. त्यानिमित्त...



छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर १६८० मध्ये शासनकर्त्याची जागा कोण घेणार? हा प्रश्न उपस्थित झाला. तो प्रश्न कोणताही शासनकर्ता निधन पावल्यावर उपस्थित होतच असतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूसमयी संभाजी महाराज हे पन्हाळगडावर होते. संभाजी महाराजांना कैद करायच्या कटात सामील असणाऱ्या मंत्र्यांना सेनापती हंबीरराव मोहिते यांनी कैद केले आणि हा कट हाणून पाडला. विशेष बाब अशी, की छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासमयी संभाजी महाराजांना युवराज म्हणून घोषित करण्यात आले होते. यावरून ज्येष्ठ पुत्र संभाजी महाराज हेच स्वराज्याचे वारस आहेत हे स्पष्ट होते.

संभाजी महाराज यांनी राज्याभिषेकाची कोणतीही घाई न करता प्रथम शत्रूच्या हल्ल्यांचा विचार करता सुभेदार, हवालदार इत्यादी सर्व अधिकाऱ्यांना बोलावून स्वराज्यातील गडकिल्ले, त्यावरील शिवबंदी आणि इतर व्यवस्था लावली. यासमयी संभाजी महाराज हे पूर्णतः राज्यकारभात लक्ष घालत असल्याच्या नोंदी आढळतात. पोर्तुगीज, इंग्रज यांच्याशी पत्रव्यवहार करताना दिसतात, तर मुरगोडचा देसाईच्या तक्रारी सोडवत रयतेला धीर देण्याचे धोरण स्वीकारतात. संभाजी महाराज स्वराज्याची व इतर व्यवस्था लावून जून १६८० मध्ये रायगडावर आल्यानंतर आपल्या मातांचे आणि बंधूचे सांत्वन केले. राज्यात स्थिरता आल्यावर संभाजी महाराजांनी २० जुलै १६८० मध्ये मंचकरोहण केले. संभाजी महाराज हे रागीट किंवा क्रूर असा बोलबाला झाल्याचे दिसत नाही. उलट ते फार मेहनती व सावध आहेत. संभाजी महाराज समजूतदार आहेत. संभाजी महाराजांच्या चालू कारभारावरून ते निराळ्या वृत्ताचे आणि स्वभावाचे म्हणजे अधिक मवाळ, दयाळू आहेत अशा अनेक नोंदी विविध साधनात आपल्याला मिळतात. छत्रपती संभाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाचे वर्णन बखरी आणि अनुपुराण या साधनात मिळते. १४, १५ व १६ जानेवारी १६८१ (रौद्रनाम संवत्सर माघ शुद्ध ७, शके १६०३) या दिवशी संभाजी महाराजांचा विधियुक्त राज्याभिषेक झाला. याप्रसंगी आपल्या वडिलांचा वारसा पुढे चालवत त्यांनी अष्टप्रधान मंडळाची नेमणूक केली व संभाजी महाराज स्वराज्याचे दुसरे छत्रपती झाले. छत्रपती संभाजी महाराज यांनी आपल्याविरोधातील कटात कैद केलेल्या मंत्र्यांची सुटका केली आणि त्यांना राज्याभिषेकासमयी विविध पदे देखील दिली. यावरून छत्रपती संभाजी महाराजांच्या एका वेगळ्या पैलूवर दृष्टिक्षेप पडतो. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर स्वराज्यात कोणत्याही प्रकारचा गोंधळ निर्माण झालेला दिसत नाही, यावरून छत्रपती संभाजी महाराज यांची स्वराज्यनिष्ठा, कर्तव्यदक्षता तसेच नियोजन इत्यादी पैलू आपल्यासमोर येतात.

# टीम इंडियाला २०२६ गाजवायचे असल्यास तीन गोष्टींवर करावे लागणार काम

## नाहीतर काही खरे नाही, जाणून घ्या...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय क्रिकेटसाठी २०२६ हे वर्ष अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. या वर्षात भारतीय संघाला टी-२० विश्वचषक खेळायचा आहे. तसेच काही कसोटी सामनेही खेळायचे आहेत. मात्र या वर्षातील बहुतांश वेळ भारतीय संघ पांढऱ्या चेंडूच्या सामन्यांमध्ये व्यस्त राहणार आहे. त्यामुळे भारतीय संघासमोर अनेक आव्हाने आहेत. यापैकी तीन प्रमुख आव्हाने ज्यावर तोडगा काढावाच लागणार आहे.

टीम इंडियाचे टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्यासाठी २०२५ चा शेवट आकडेवारीनुसार खूपच खराब ठरला. २०२६ च्या टी-२० विश्वचषकापूर्वी सूर्याचा फॉर्म संघासाठी एक मोठ कोडे बनले आहे. मागील १६-१७ डावांमध्ये त्यांची सरासरी १५ च्या आसपास राहिला आहे आणि त्याच्या बॅटमधून कोणतीही मोठी खेळी आली नाही. कर्णधार म्हणून त्याच्यावर केवळ धावा करण्याचा दबाव नाही, तर आपल्या जागेबद्दल उठणाऱ्या प्रश्नांना उत्तर देण्याचेही आव्हान आहे.

भारताचा घरच्या मैदानावर कसोटीतील रेकॉर्ड नेहमीच उत्कृष्ट राहिला आहे. परंतु अलीकडे न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेसारख्या संघांनी आपल्याला बॅकफूटवर ठेवले होते. २०२६ मध्ये भारताला आपल्या भूमीवर अनेक महत्त्वाचे कसोटी सामने खेळायचे आहेत. फिरकीला अनुकूल पिचेसवर फलंदाजांचा संघर्ष आणि वरिष्ठ खेळाडूंच्या अनुपस्थितीत युवा खेळाडूंची सातत्यपूर्ण कामगिरी ही भारताची सर्वांत मोठी परीक्षा असेल.

एकीकडे गंभीरच्या प्रशिक्षणात भारताने चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ आणि आशिया कप जिंकून व्हाईट-बॉल क्रिकेटमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केले, तर दुसरीकडे कसोटी फॉरमॅटमध्ये संघाला काही लाजिरवाण्या पराभवांना सामोरे जावे लागले आहे. गंभीरच्या 'आक्रमक' रणनीतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत, जी मर्यादित षटकांमध्ये यशस्वी ठरत असली तरी रेड-बॉल क्रिकेटमध्ये संघाचे संतुलन बिघडवत आहे. २०२६ हे गंभीर यांच्यासाठी हे सिद्ध करण्याचे वर्ष असेल की तो सर्व फॉरमॅटमध्ये समान प्रभावी प्रशिक्षक आहेत.

भारतीय क्रिकेट संघासाठी २०२६ हे वर्ष आव्हानात्मक असणार आहे. टी-२० विश्वचषक आणि कसोटी सामन्यांमध्ये संघाला चांगली कामगिरी करावी लागणार आहे. कर्णधार सूर्यकुमार यादवचा फॉर्म, घरच्या मैदानावर कसोटीतील वर्चस्व टिकवणे आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर याची कसोटीतील रणनीती या तीन प्रमुख बाबींवर संघाचे यश अवलंबून असेल.



# लाकूड बनणार काचेसारखे पारदर्शक!

## विजेविना घर थंड ठेवणारी जगातील पहिली 'स्मार्ट लाकडी खिडकी'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

घरांना आधुनिक आणि ऊर्जाक्षम बनविण्यासाठी दक्षिण कोरियाच्या शास्त्रज्ञांनी एक क्रांतिकारी शोध लावला आहे. त्यांनी लाकडापासून अशी एक 'स्मार्ट विंडो' (खिडकी) तयार केली आहे. जी सूर्याच्या घातक अतिनील किरणांना रोखण्यासोबतच घराचे तापमानही नियंत्रित करेल. विशेष म्हणजे ही खिडकी चालविण्यासाठी कोणत्याही विजेची किंवा सेन्सरची गरज भासणार नाही.

दक्षिण कोरियाच्या 'हानबाट नॅशनल युनिव्हर्सिटी' आणि 'कोंगजू नॅशनल युनिव्हर्सिटी'च्या संशोधकांनी यावर संशोधन केले आहे. शास्त्रज्ञांनी यासाठी 'बाल्सा' नावाच्या लाकडाचा वापर केला. या लाकडावर प्रक्रिया करून त्यात 'लिक्विड क्रिस्टल' मिसळण्यात आले. या प्रक्रियेमुळे लाकडाचा नैसर्गिक रंग बदलून ते एखाद्या काचेसारखे पारदर्शक आणि चमकदार बनले आहे. आजकाल बाजारात असलेल्या स्मार्ट खिडक्यांना चालविण्यासाठी विजेची गरज असते. मात्र या नवीन लाकडी खिडकीला कोणत्याही बाह्य ऊर्जेची गरज नाही.



**१) तापमान नियंत्रण :** जेव्हा खोली थंड असते तेव्हा ही खिडकी पूर्णपणे पारदर्शक होते. ज्यामुळे सूर्याचा प्रकाश आता येऊन खोली उबदार होते.

**२) स्वयंचलित बदल :** जेव्हा खोलीचे तापमान वाढते तेव्हा ही खिडकी आपोआप अपारदर्शक बनते. ज्यामुळे उष्णता रोखली जाते.

**३) कमी प्रकाश :** संशोधनानुसार सामान्य तापमानात ही खिडकी केवळ २८ टक्के प्रकाश आत येऊ देते. पण तापमान ४० अंशांच्या पुढे गेल्यावर ती आपली क्षमता वाढवून प्रकाश आणि उष्णता अधिक प्रभावीपणे रोखते. ही खिडकी केवळ दिसायला आकर्षक नाही, तर ती घराची प्रायव्हसी (व्हिजिबिलिटी) देखील नियंत्रित करू शकते. विटा आणि दगडांच्या घरांमध्ये ही खिडकी उष्णता आणि थंडीपासून संरक्षण मिळविण्यासाठी एक उत्तम नैसर्गिक पर्याय ठरू शकते. यामुळे एअर कंडिशनिंग आणि हीटिंगवर होणारा विजेचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. सूर्याची हानिकारक किरणे रोखणारी ही 'ट्रान्सपरंट' लाकडी खिडकी लवकरच जागतिक बाजारपेठेत उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# करोडपती तरुण बनला माघ मेळ्यात संन्यासी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उत्तर प्रदेशातील रायबरेली येथील २२ वर्षीय अमर कमल रस्तोगी या तरुणाने संसाराचा त्याग करून संन्यास घेण्याचा धक्कादायक निर्णय घेतला. १ जानेवारी रोजी नवीन वर्षाच्या निमित्ताने लखनौमधील एका चर्चमध्ये दर्शनासाठी जातो आणि सायंकाळ परततो, असे सांगून तो घराबाहेर पडला होता. मात्र, तो घरी परतलाच नाही आणि त्याचा मोबाईलही बंद झाला. मुलगा घरी न परतल्याने त्याचे वडील नवीन कमल रस्तोगी आणि संपूर्ण कुटुंब काळजीत होते. तीन दिवसानंतर अमरने आपल्या मोबाईलवर एक स्टेटस ठेवले. त्यावरून तो प्रयागराज येथील माघ मेळ्यात असून त्याने संन्यास घेतला असल्याची माहिती घरच्यांना मिळाली. हे पाहताच त्याची आई सोनी रस्तोगी आणि त्याच्या बहिणी तातडीने प्रयागराजला पोहोचल्या.

**आईला पाहूनही बदलला नाही निर्णय**

माघ मेळ्यात भगवे वस्त्र परिधान केलेल्या आपल्या मुलाला पाहून आईला रडू कोसळले. सुरुवातीला अमरने चक्क आपल्या आईलाच ओळखण्यास नकार दिला. बराच वेळ विनवण्या केल्यानंतर त्याने आईला मिठी मारली. मात्र, घरी परतण्यास स्पष्ट नकार दिला. मी आता सांसारिक जीवनाचा त्याग केला आहे आणि





संतांच्या सेवेतच जीवन व्यतीत करणार, असा संकल्प त्याने आपल्या कुटुंबियांना ऐकवला.

**यशस्वी उद्योजक ते संन्यासी: थक्क करणारा प्रवास**

अमर कमल रस्तोगी हा केवळ शिकलेलाच नाही, तर एक यशस्वी तरुण होता. रायबरेलीत त्याचे स्वतःचे 'जनसेवा केंद्र' होते. बँकांशी संबंधित कामामुळे त्याचे मोठ्या अधिकाऱ्यांशी उत्तम संबंध होते. महागड्या हॉटेल्समध्ये जेवणे आणि एसी रूममध्ये राहणे ही त्याची सवय होती. त्याने स्वतःच्या हिमतीवर रायबरेलीच्या मुख्य रस्त्यावर दोन चार मजली इमारती उभ्या केल्या होत्या. ज्याची आजची किंमत दीड कोटींहून अधिक आहे. तीन बहिणींचा एकुलता एक भाऊ असल्याने कुटुंबातही त्याचे खूप लाड होत होते.

**महामंडलेश्वर गोपालदास**

१ जानेवारी २०२६ रोजी अमर पहिल्यांदाच प्रयागराजला आला होता. संगमाच्या तीरावर पोहोचताच त्याचे मन अचानक 'सनातन' धर्मात रमले. महावीर पूल ओलांडून तो वैष्णव संत महामंडलेश्वर गोपालदास यांच्या संपर्कात आला. तिथे त्याने संन्यास घेण्याची इच्छा व्यक्त केली. सुरुवातीला संतांनी त्याला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, पण अमर आपल्या निर्णयावर ठाम राहिला. अखेर त्याचे क्षौरकर्म (मुंडण) करून त्याला संन्यासाची दीक्षा देण्यात आली.

**आता 'अमर' झाला 'यश्वनी दास'**

दीक्षा मिळाल्यानंतर अमरचे नाव बदलून आता 'यश्वनी दास' झाले आहे. त्याने आपली सर्व मालमत्ता आणि स्वतः बांधलेली दोन्ही घरे आपल्या आई-वडिलांच्या नावे करून दिली आहेत. पदवीधर शिक्षण घेतलेला हा तरुण आता साध्या सुती वस्त्रात आणि अत्यंत कठीण परिस्थितीत राहून देवाच्या भक्तीत लीन झाला आहे.

## मोबाईल स्टेटसमुळे आईला कळले गुपित

### कुटुंबासाठी मोठा धक्का

अमर आता संतांच्या छावणीत राहून सेवाकार्य करत आहे. त्याचे वडील अजूनही या धक्क्यातून सावरलेले नाहीत. आपला तरुण मुलगा पुन्हा कधीतरी घरी परतेल, अशी आशा त्यांना वाटत आहे. दुसरीकडे त्याची आई जड अंतःकरणाने रायबरेलीला परतली असून आपला मुलगा निर्णय बदलेल, यासाठी देवाकडे प्रार्थना करत आहे. ज्या मुलाने स्वतःच्या मेहनतीने घर उभे केले, तोच मुलगा आता गवताच्या अंथरुणावर झोपणार आहे, हे पाहून आई-वडील हताश झाले आहेत.

प्रयागराजमध्ये दरवर्षी कुंभ किंवा माघ मेळ्याच्या काळात साधू- संतांच्या विचारांनी प्रभावित होऊन अनेक तरुण अशा प्रकारे संन्यास घेतात. गेल्या वर्षी महाकुंभातही अशा अनेक घटना समोर आल्या होत्या. ज्यामुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# ॲड. नम्रता हिंदुजांचा प्रवास गृहिणींसाठी प्रेरक

## हिंदुजा दाम्पत्याचा सिंधी समाजात लौकिकाचा डबल धमाका!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : जिद्द, सातत्य, शिक्षणावरील निष्ठा आणि समाजकार्याची बांधिलकी यांचा सुरेख संगम साधत ॲड. सौ. नम्रता अजय हिंदुजा यांनी बार कौन्सिल ऑफ इंडिया आयोजित ऑल इंडिया बार परीक्षा (एआयबीइ २०) यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे. आता अधिकृतपणे वकील झाल्या आहेत. त्यांचा हा प्रवास अनेक गृहिणी व महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

विवाहापूर्वीच ॲड. सौ. हिंदुजा यांनी इंग्रजी विषयात एम.ए. (इंग्रजी) ही पदव्युत्तर पदवी संपादन केली होती. शिक्षणाची आवड आणि जिद्द यामुळे त्यांनी उच्च शिक्षणाचा




प्रवास सातत्याने पुढे सुरू ठेवला.चार्टर्ड अकाउंटंट अजय हिंदुजा यांच्याशी विवाहानंतरही त्यांनी शिक्षण थांबविले नाही. त्यांनी नवलाबाई प्रतिष्ठान येथून बी.एड. पूर्ण केले. त्यानंतर कायद्याच्या क्षेत्रात करिअर घडवण्याचा निर्धार केला. २०२२ मध्ये तीन वर्षांच्या एलएल.बी. अभ्यासक्रमात प्रवेश घेतला. यावेळी त्यांचे पती सी.ए. अजय हिंदुजा यांनीही त्यांच्यासोबत एलएल.बी. अभ्यासक्रम पूर्ण केला. परस्पर सहकार्य, सातत्यपूर्ण अभ्यास व मेहनतीच्या जोरावर सन २०२५ मध्ये दोघांनीही एलएल.बी. परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली.

यानंतर ॲड. सौ. हिंदुजा यांनी बार कौन्सिल ऑफ इंडिया आयोजित ऑल इंडिया बार परीक्षा दिली. ती यशस्वीरीत्या उत्तीर्ण करत वकिलीचा मानाचा दर्जा प्राप्त केला. त्यामुळे त्यांचा शैक्षणिक व व्यावसायिक प्रवास एका नव्या टप्प्यावर पोहोचला आहे. शैक्षणिक

**ॲड. सौ. नम्रता हिंदुजा या अमळनेरातील सिंधी समाजातील पहिल्या वकील, तर त्यांचे पती तथा लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष अजय हिंदुजा हे अमळनेरातील सिंधी समाजातील पहिले सी.ए. आहेत.**

यशासोबतच ॲड. सौ. हिंदुजा या सामाजिक कार्यातही सक्रिय आहेत. एलएल.बी. अभ्यासक्रमादरम्यानच त्यांनी लायनेस क्लब ऑफ इंडियाच्या २०२४ मध्ये अध्यक्षा पदाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली. त्यांच्या कार्यकाळात क्लबने विविध सामाजिक उपक्रम राबविले. सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या नेतृत्वाखाली क्लबला अनेक सामाजिक पुरस्कार प्राप्त झाले. क्लबने समाजकार्याच्या क्षेत्रात नवी उंची गाठली.

कौटुंबिक जबाबदाऱ्या, शिक्षण, समाजकार्य आणि करिअर यांचा समतोल साधत यश मिळवणाऱ्या सौ. नम्रता हिंदुजा या महिलांसाठी आदर्श ठरत आहेत. शिक्षणाला वय, भूमिका किंवा परिस्थितीची मर्यादा नसते हे त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल कुटुंबीय, मित्रपरिवार, सामाजिक संस्थाकडूल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




*अमळनेर : भारतीय सेना दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमप्रसंगी उपस्थित डॉ. रवींद्र मराठे, प्रा. विकास मोरे, प्रा. उषा मोरे व प्रा. विशाल चव्हाण.*

# भारतीय सेना दिनानिमित्त

## प्रताप महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयाच्या संरक्षणशास्त्र विभागातर्फे गुरुवार, दि. १५ जानेवारी रोजी भारतीय सेना दिवस उत्साहात झाला. यानिमित्त रांगोळी स्पर्धा व मनोगतांचा कार्यक्रम झाला.

भारतीय लष्कराचे पहिले कमांडर इन चीफ के. एम. करिअप्पा व प्रताप महाविद्यालयाचे प्रेरणास्थान श्रीमंत प्रताप शेठजी यांचे प्रतिमापूजन झाले. भारतीय सैन्याच्या शौर्याला अभिवादन करण्यात आले. रांगोळी स्पर्धेत विद्यार्थ्यांनी भारतीय सैन्याची शौर्यगाथा आणि विविध चिन्हे रांगोळीच्या माध्यमातून साकारली. मनोगतात विद्यार्थ्यांनी भारतीय सेनेचा इतिहास, त्याग आणि आजच्या काळातील सैनिकांचे महत्त्व यावर विचार मांडले. विभागप्रमुख डॉ. रवींद्र मराठे, प्रा. विकास मोरे व प्रा. उषा मोरे यांनी सेना दिनाचे महत्त्व सांगितले. भारतीय सैनिक सीमेवर अहोरात्र पहारा देतात म्हणूनच आपण सुरक्षित आहोत, प्रत्येकाने नेहमी सैन्याप्रती कृतज्ञ राहावे, असे आवाहन करण्यात आले. प्रा. विशाल चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. प्रा. उषा मोरे यांनी सूत्रसंचलन केले. प्रा. विकास मोरे यांनी आभार मानले. संरक्षणशास्त्र विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक उपस्थित होते.

## महेशबापू देशमुख यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव..!





*अमळनेर : पालिकेतील गटनेते महेशबापू देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त औक्षण करताना सौ. सोनालीताई देशमुख. दुसऱ्या छायाचित्रात महेशबापू देशमुख यांचे हर्षोल्लासात अभीष्टचिंतन करताना सामाजिक कार्यकर्ते सुरज परदेशी. शेजारी सौ. सोनालीताई देशमुख, रवींद्र पाटील, बाळू पाटील, ज्ञानेश्वर लांडगे, प्रताप साळी व प्रा. भरत परदेशी.*



*अमळनेर : पालिकेतील गटनेते महेशबापू देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना बाळासाहेब संदानशिव, नगरसेवक दीपक चौगुले, शिवसेनेचे गटनेते पंकज चौधरी, नगरसेवक सुयोग धनगर, कैलास नामदेव पाटील, चंद्रकांत कंखरे, पंकज भोई, तुळशीराम हटकर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम व मुन्ना शर्मा आदी.*

## संन्यास दिक्षा- वर्धापनदिन सोहळा

# श्रीक्षेत्र कपिलेश्वर येथे १२ फेब्रुवारीस विविध कार्यक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील निम येथील श्रीक्षेत्र कपिलेश्वर महादेव मंदिराचे मठाधिपती महामंडलेश्वर स्वामी हंसानंदतिर्थ महाराज यांना गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी रोजी सन्यास दिक्षा घेण्यास २९ वर्ष पूर्ण होत आहेत. तीसाव्या वर्षी ते पदार्पण करीत आहेत. या पार्श्वभूमीवर श्रीक्षेत्र कपिलेश्वर येथे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

यावेळी ओंकारेश्वर येथील अन्नपूर्णा आश्रमाचे महामंडलेश्वर स्वामी सच्चिदानंदगिरी महाराज, इंदूर येथील अन्नपूर्णा आश्रमाचे स्वामी जयेन्द्रानंदगिरी महाराज, त्र्यंबकेश्वर येथील स्वामी कृष्णा बोधानंदजीगिरी महाराज, बलवाडी (मध्य प्रदेश) येथील स्वामी भरतानंदजी महाराज, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले प्रमुख अतिथी असतील.

कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वामी हंसानंदजीतीर्थ महाराज भक्त मंडळ, श्रीक्षेत्र कपिलेश्वर मंदिर ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

**कार्यक्रमाची रूपरेषा**

गुरूवार, दि. १२ जानेवारी रोजी सकाळी साडेआठ वाजता रूद्राभिषेक, साडेनऊ वाजता पाद्यपूजन, सकाळी १० ते १२ उपस्थित संत महानुभवांचे संन्यास परंपरेवर प्रवचन व दुपारी १२ वाजेनंतर महाप्रसाद वाटप होईल.

# सफाई कामगार, कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न लागणार मार्गी

## निवेदनाची पालिकेकडून तत्काळ दखल; हजेरी पत्रक २५ तारखेपर्यंत सादर करण्याच्या सूचना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पालिकेतील सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन व निवृत्तीवेतनधारकांचे निवृत्तीवेतन प्रत्येक महिन्याच्या १ ते ५ तारखेच्या आत अदा करण्यात यावे, अशी मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेस, अखिल महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघ व नगरपालिका कामगार युनियन यांनी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना निवेदन दिले आहे. उपनगराध्यक्ष प्रशांत निकम यांनी हे निवेदन स्वीकारले. या निवेदनाची प्रशासनाने तत्काळ दखलही घेतली आहे. त्यामुळे पालिका कर्मचारी व निवृत्तीवेतनधारकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. निवेदनात म्हटले आहे, की पालिका कार्यालयीन कर्मचारी, आरोग्य विभागातील कर्मचारी व सफाई कामगार हे शहराच्या स्वच्छता, आरोग्य व प्रशासकीय सेवा अखंडित ठेवण्यासाठी प्रामाणिकपणे कार्यरत आहेत. अनेकदा वेतन व निवृत्तीवेतन उशिरा मिळूनही पालिकेची प्रतिमा अबाधित राहावी, या भावनेतून कर्मचाऱ्यांनी आपली कर्तव्ये पार पाडली आहेत. वेळेवर वेतन मिळणे हा कर्मचाऱ्यांचा मूलभूत



*अमळनेर : उपनगराध्यक्ष प्रशांत निकम यांना निवेदन देऊन सत्कार करताना रघुनाथ मोरे, विकास जाधव, रुपचंद पारे, मुकेश बिऱ्हाडे, नवल बिऱ्हाडे, विनोद जाधव आदी.*

हक्क असून, त्याचा थेट परिणाम त्यांच्या कौटुंबिक जीवनावर होत आहे.

दरम्यान, याबाबत नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर महिन्याच्या १ तारखेला वेतन व निवृत्तीवेतन अदा करण्याचा निर्णय घेतल्याने कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला. पालिकेच्या इतिहासात प्रथमच वेतन १ तारखेला मिळाल्याने कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले. निवेदनानंतर उपनगराध्यक्ष श्री. निकम यांनी मुख्याधिकारी यांना स्पष्ट सूचना दिल्या. सफाई कामगारांचे हजेरी पत्रक प्रत्येक महिन्याच्या २५ तारखेच्या आत आस्थापना विभागाकडे सादर करण्यात यावे, जेणेकरून वेतन अदा करण्यात कोणताही विलंब होणार नाही. यावेळी अखिल भारतीय सफाई मजदूर काँग्रेसचे प्रदेश सचिव रघुनाथ मोरे, प्रदेश संघटन मंत्री विकास टिल्लूजी जाधव, अखिल महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघाचे अध्यक्ष रुपचंद पारे, सरचिटणीस मुकेश बिऱ्हाडे, सहचिटणीस नवल बिऱ्हाडे, पालिका कामगार युनियनचे अध्यक्ष विनोद जाधव, उपाध्यक्ष गुरुचरण पवार, सहसचिव सुशील बोयत, पप्पू कलोसे, विजय पवार, पापाभय्या आदींचा समावेश होता. कामगार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेचे स्वागत केले आहे. तसेच वेतन व निवृत्तीवेतन वेळेत देण्याबाबत कायमस्वरूपी आदेश निर्गमित करावेत, अशी मागणीही केली आहे.




## मना सज्जना...

## ‘न होता मना सारिखे दुःख मोठे’



**परम स्नेही मित्रहो...**
सद्गुरूंचे स्मरण आणि प्रभू श्रीरामचंद्र यांचे चिंतन करूया.

**नको रे मना द्रव्य ते पुढिलांचे ।**
**अति स्वार्थ बुद्धी ने रे पाप साचे ।**
**घडे भोगणे पाप ते कर्म खोटे ।**
**न होता मना सारिखे दुःख मोठे ॥ ९ ॥**

प्रथम या श्लोकातील पहिल्या दोन चरणांचा विचार करूया. या ठिकाणी समर्थांनी वापरलेला ‘द्रव्य’ हा शब्द केवळ द्रव पदार्थ या मर्यादित अर्थाने नाही, तर फार व्यापक अर्थाने वापरलेला आहे. सामान्यतः द्रव्य म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर पैसा उभा राहतो; पण समर्थांच्या दृष्टीने जे वाहते, जे खर्ची पडते, जे अर्पण करता येते ते सर्व द्रव्य आहे.

म्हणजेच पैसा, संपत्ती, अन्न, वस्त्र, श्रम, वेळ, बुद्धी, वाणी, अगदी देहसुद्धा द्रव्यरूपच आहे. संतांच्या दृष्टीने द्रव्याचा खरा कस साठवण्यात नसून अर्पण करण्यात आहे. स्वार्थासाठी साठवलेले द्रव्य मनाला जड करते; परंतु परमार्थासाठी वाहिलेले द्रव्य मन हलके करते. म्हणूनच समर्थ स्पष्ट सांगतात–
**‘द्रव्ये विन्मुख तो निर्धन.’**
ज्याच्याकडे खूप आहे, पण जे सत्कार्यास उपयोगी नाही तो प्रत्यक्षात गरीबच आहे. याच अर्थाचे अतिशय प्रभावी वचन ईशावास्य उपनिषदात येते.
**ईशावास्यमिदं सर्वं यत्किंच जगत्यां जगत् ।**
**तेन त्यक्तेन भुंजिथा मा गृधः कस्यस्विद्धनम् ॥**

**अर्थ :** हे संपूर्ण विश्व ईश्वराने व्यापलेले आहे. म्हणून जे काही आपल्याला प्राप्त झाले आहे ते ईश्वरकृपा मानून स्वीकारावे, त्यागभावनेने आणि कर्तव्यभावनेने त्याचा उपभोग घ्यावा. इतरांच्या धनावर, संपत्तीवर, अधिकारांवर डोळा ठेवणे हे अनीतीचे, अधर्माचे लक्षण आहे. लोभ मनात असंतोषाची बीजे पेरतो. परधनाची इच्छा मनाला कायम अस्वस्थ ठेवते. जे आपल्याला ईश्वरकृपेने मिळाले आहे त्यात समाधान मानावे आणि जे इतरांचे आहे त्याचा आदर करावा, हीच खरी साधना आहे. दुसऱ्याचे पद, दुसऱ्याचे सुख, अगदी दुसऱ्याची लोकप्रियताही यांच्यावरसुद्धा लोभ धरू नये.
समर्थ स्पष्ट इशारा देतात–
**‘अति लोभाने मरण.’**
लोभ टाळला तर जीवन शुद्ध राहते, मन निर्मळ राहते आणि कीर्ती आपोआप येते. स्वार्थबुद्धी आवश्यक आहे; पण अति स्वार्थबुद्धी असंतोषाला आमंत्रण देते.
श्लोकाच्या पुढील चरणांत समर्थ सांगतात–
**घडे भोगणे पाप ते कर्म खोटे ।**
**न होता मना सारिखे दुःख मोठे ॥**
हव्यासामुळे मनाची अस्वस्थता वाढते. त्यातून परधनाचा लोभ निर्माण होतो आणि पुढे त्यातून अनुचित, अयोग्य कर्मे घडतात. अखेर त्याचे फळ पाप आणि दुःखच असते. मनासारखे घडले नाही की दुःख होते, हेच मनाच्या अधीन झाल्याचे लक्षण आहे. आपण मनाला नियंत्रित करायचे, की मनाने आपल्याला नियंत्रित करायचे हा खरा प्रश्न आहे. म्हणूनच समर्थ या श्लोकातून मनाला सावध करतात.
संत नामदेव महाराज यांचा एक अभंग आहे. त्यात ते अति स्वार्थबुद्धी वागणे कसे चुकीचे आहे ते पटवून देतात.
**जे जे आपुले ते तेव्हढेची पुरे ।**
**अधिकाची हाव करे तो नरके उरे ॥**

**जय जय रघुवीर समर्थ!**

**– भाऊसाहेब देशमुख, अमळनेर**
**मो. : 94203 89541**

# ३० वर्षांनतर सूर्य–शनीचा दुर्मिळ संयोग!

## ‘या’ राशींचे नशीब अचानक बदलणार; करिअरमध्ये मिळेल सोन्याची संधी, पैशांचा येईल पाऊस

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

धनू राशीच्या लोकांसाठी सूर्य–शनी संयोग वाहन आणि स्थावर मालमत्तेशी संबंधित भावात तयार होत आहे. त्यामुळे या काळात घर, वाहन किंवा प्रॉपर्टी खरेदी संदर्भात हालचाली वाढू शकतात.

ज्योतिषशास्त्रानुसार मान–सन्मान, प्रतिष्ठा आणि नेतृत्वाचे कारक सूर्य देव मार्च महिन्यात मीन राशीत प्रवेश करणार आहेत. विशेष म्हणजे कर्मफळदाता शनी आधीच मीन राशीत गोचर करत आहेत. त्यामुळे सुमारे ३० वर्षांनंतर मीन राशीत सूर्य–शनी यांचा दुर्मिळ संयोग तयार होत आहे. हा संयोग काही राशींसाठी करिअर, नोकरी, जबाबदाऱ्या आणि वैयक्तिक प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरू शकतो, असे ज्योतिषांचे मत आहे.

**धनू :** धनू राशीच्या लोकांसाठी सूर्य–शनी संयोग वाहन आणि स्थावर मालमत्तेशी संबंधित भावात तयार होत आहे. त्यामुळे या काळात घर, वाहन किंवा प्रॉपर्टी खरेदी संदर्भात हालचाली वाढू शकतात. कामाच्या ठिकाणी स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधी मिळू शकते. करिअरविषयक



काही महत्त्वाचे निर्णय आत्मविश्वासाने घेता येतील. कौटुंबिक नातेसंबंधांमध्ये स्थैर्य जाणवू शकते. तसेच आईशी संबंधित विषय सकारात्मक राहण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** मिथुन राशीच्या लोकांसाठी हा संयोग कर्मस्थानात तयार होत असल्याने व्यावसायिक जीवनावर त्याचा थेट परिणाम दिसू शकतो. नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना संधी मिळण्याची शक्यता आहे. नोकरी करणाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदाऱ्या येऊ शकतात, मात्र त्यातूनच पदोन्नती किंवा मानधनवाढीचे संकेत मिळू शकतात. व्यवसाय करणाऱ्यांसाठीही हा काळ विस्तार आणि स्थिर वाढीसाठी अनुकूल मानला जातो. विशेषतः लोह, खनिज, तेल किंवा औद्योगिक क्षेत्राशी संबंधित व्यवसायांना लाभ होण्याची शक्यता वर्तविली जाते.


**मीन :** मीन राशीतच सूर्य–शनि युती होत असल्याने या राशीच्या लोकांसाठी हा काळ विशेष महत्त्वाचा ठरू शकतो. लग्न भावात तयार होणाऱ्या या योगामुळे मान–सन्मान, आत्मविश्वास आणि जबाबदाऱ्यांमध्ये वाढ दिसू शकते. कामाबाबत ऊर्जा आणि गांभीर्य वाढेल. नवीन संधी उपलब्ध होऊ शकतात, मात्र त्याबरोबरच जबाबदाऱ्याही वाढण्याची शक्यता आहे. वैवाहिक जीवनात स्थैर्य राहील, तसेच जीवनसाथीच्या करिअरमध्ये प्रगतीचे संकेत मिळू शकतात.

**टीप: हा लेख कोणताही मोठा निर्णय घेताना वैयक्तिक कुंडलीचा विचार करणे उपयुक्त ठरते.**

# सूर्याचा नक्की रंग कोणता? तो पिवळा का दिसतो?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सूर्याचे चित्र काढायचे असेल तर आपण हमखास पिवळा रंग हातात घेतो. त्यात नारंगी आणि लाल रंग सुद्धा वापरतो. परंतु आपल्या सूर्यमालेच्या मध्यभागी असलेला हा तारा खरे तर पिवळा नाही, ना तो नारंगी किंवा लाल रंगाचा आहे. हे सर्व रंग मिळून आणखी काही रंग आहेत. सूर्य निरंतर रंगांमध्ये प्रकाश उत्सर्जित करतो. जर प्रिझमच्या माध्यमातून (लोलक) सूर्यप्रकाश पाहिला तर तो लाल, नारंगी, पिवळा, हिरवा, नीळा, आणि जांभळ्या रंगाचा आहे, हे लक्षात येईल.



### सूर्यग्रहण म्हणजे काय?

सौर वादळ म्हणजे काय? पृथ्वीवर त्याचा काय परिणाम होतो?

इंद्रधनुष्याप्रमाणे हे रंग डोळ्यांना दिसतात. खरे तर इंद्रधनुष्य म्हणजे सूर्यप्रकाश जेव्हा वातावरणातील पाण्याच्या थेंबांमधून जातो तेव्हा तो आपल्या डोळ्याला कसा दिसतो ते दृश्य. हे पाण्याचे थेंब छोट्या प्रिझमसारखे कार्य करतात. बहुरंगी सूर्य हा लख्ख प्रकाशामुळे उर्जेने भरलेला दिसत असला, तरी ते पूर्णतः बरोबर आहे असे म्हणता येणार नाही. कारण सूर्याकडून उत्सर्जित होणाऱ्या सूर्यप्रकाशाचा रंग संमिश्र असतो. मात्र आपल्याला केवळ एक रंग दिसतो. याविषयी जाणून घ्यायचे असेल तर आकाशात एक संकेत मिळतो. आकाशात असलेले ढग जे सूर्यप्रकाश प्रतिबिंबित करतात ते ना पिवळे आहेत ना इतर कोणत्या रंगाचे आहेत. ते पांढऱ्या रंगाचे आहेत. कारण सूर्य जो प्रकाश उत्सर्जित करतो त्याचा खरा रंग हाच आहे.

### पिवळा का दिसतो?

सूर्यमालेतील प्रत्येक रंगाची वेगळी तरंगलांबी (एका लहरीच्या शिखेपासून दुसऱ्या लहरीच्या शिखेपर्यंतचे अंतर) असते. एका टोकाला लाल रंग आहे ज्याची तरंगलांबी सर्वाधिक आहे. रंग तरंगलांबीमध्ये कमी होत जातात. लाल ते नारंगी, पिवळा, हिरवा, निळा, इंडिगो, जांभळा या पद्धतीने. कमी तरंगलांबी असलेल्या रंगाचे प्रकाशकण अधिक तरंगलांबी असलेल्या प्रकाशकणांपेक्षा अधिक विखुरलेले आणि उत्तेजित असतात. अंतराळात प्रकाश कोणत्याही अडथळ्याविना प्रवास करत असतो त्या ठिकाणी प्रकाशकणांना बदलणारे असे काहीही नाही. त्यामुळे सूर्य का एखाद्या पांढल्या चेंडूसारखा असतो. हा या ताऱ्याचा ‘खरा रंग’ आहे. मात्र, जेव्हा सूर्यकिरणे पृथ्वीच्या वातावरणाच्या माध्यमातून प्रवास करतात, हवेतील रेणू हे कमी तरंगलांबी असलेल्या प्रकाशकणांमध्ये बदल घडवून आणतात. अधिक तरंगलांबी असलेल्या स्पेक्ट्रम (लोलकातून बाहेर पडणारे रंग) मधील रंग हे आपल्या डोळ्यापर्यंत अगदी सहजपणे पोहोचू शकतात.

### हिरवा सूर्य?

कदाचित काही अशीही संकेतस्थळे किंवा सोशल मीडियावरील पोस्ट पाहिल्या असतील, की ज्यात सूर्य प्रत्यक्षात हिरवा असल्याचा दावा करण्यात आलेला आहे. आपण जर सूर्याच्या स्पेक्ट्रममधील रंगांची मांडणी केली तर सर्वांत वरच्या शिखरावर हिरवा भाग असलेल्या रंगाच्या डोंगरासारखी आकृती तयार होते. मानवी डोळ्यांनी सूर्यकिरणांच्या रंगामध्ये असलेला फरक जाणवत नाही, मात्र हा फरक पाहता येतील अशी काही उपकरणे उपलब्ध असून, त्यातून बहुतांश वेळा हिरवा रंगच प्रामुख्याने पाहायला मिळतो.

### मावळतीचा लाल रंग?

सूर्य जेव्हा उगवत असतो किंवा मावळत असतो तेव्हा तो क्षितीजापासून सर्वात जवळच्या बिंदूवर असतो. त्यामुळे सूर्यकिरणे मोठ्या प्रमाणात हवामानाच्या रेणूंमधून प्रवास करतात. त्यामुळे निळ्या छटा असलेल्या रंगामध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होतात आणि मोठ्या तरंगलांबीतील लाल आणि केशरी रंगांचा सूर्याच्या प्रतिमेवर प्रभाव पाहायला मिळतो. विशेष म्हणजे या संपूर्ण क्रियेला एक नावही आहे. त्याला रेलेघ स्कॅटरिंग असे म्हणतात. १९ व्या शतकातील ब्रिटिश भौतिक शास्त्रज्ञ लॉर्ड रेलेघ यांच्या नावावरून हे नाव देण्यात आले आहे. सूर्य आकाशामध्ये प्रवास करत असताना पृथ्वीशी त्याचा कोन सातत्याने बदलत असतो. त्यामुळे सूर्यास्ताच्या वेळी असलेल्या लाल रंगासह दिवसातील वेगवेगळ्या वेळांनाही सूर्याचा रंग काहीसा बदलतो.

# सूर्य देव आहे की ग्रह?

## त्यांची इतर नावे काय आहेत?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रविवार हा सूर्य देवाला समर्पित आहे. ज्यांच्या प्रकाशाद्वारे विश्वाचा संवाद साधला जात आहे. सूर्यदेवाची उपासना केल्याने आपले भाग्य तर उजळतेच, पण प्रत्येक क्षेत्रात मान–सन्मान मिळतो. धार्मिक मान्यतांनुसार सूर्यदेवाला नियमित अर्घ्य दिल्याने व्यक्ती रोगमुक्त राहते आणि इच्छित परिणाम प्राप्त होतात. सूर्यदेवाला अर्घ्य अर्पण करण्यासाठी तांब्याच्या कलशात पाणी, अखंड, लाल सिंदूर, लाल फुले आणि साखरेची मिठाई मिसळावी. अनेकदा आपल्या मनात प्रश्न येतो, की सूर्य हा देव आहे की ग्रह?

### सूर्य देव आहे

पौराणिक कथेनुसार सूर्य देवाच्या उत्पत्तीचे अनेक संदर्भ आहेत. पौराणिक मान्यता अशी आहे, की सूर्य देवाचे वडील महर्षी कश्यप आणि आई अदिती होती. आदितीच्या मुलाचे नाव आदित्य होते. ३३ कोटी देवतांमध्ये आदितीच्या १२ पुत्रांचा समावेश आहे, त्यापैकी एक सूर्य देव देखील आहे.

### सूर्य देवाचे कुटुंब

सूर्य देव यांचा विवाह



भगवान विश्वकर्मा यांची कन्या संग्या हिच्याशी झाला होता, ज्यांच्यापासून तीन मुले झाली. त्यातून मनू, यम आणि एक मुलगी यमुना हे दोन पुत्र झाले. यमुनेलाच कालिंदी म्हणतात. विश्वासानुसार नाम सूर्याचे तेजस्वी रूप सहन करू शकत नाही आणि तिने स्वतःची सावली तयार केली, ज्याला स्वर्ण म्हणतात. स्वर्णाच्या पोटातून सवर्ण मनू, शनी आणि ताप्ती ही मुले झाली.

### सूर्याला इतर कोणत्या नावांनी ओळखले जाते?

रवी, दिनकर, दिवाकर, दिनमणी, आदित्य, अनंत, सविता, प्रभाकर, मार्तंड, अर्क, भानू, भास्कर, पतंग आणि विवासवान.

### सूर्य देव किंवा ग्रह


पौराणिक ग्रंथानुसार सूर्य हा ग्रह नसून देवता आहे. वेदांमध्ये सूर्य देवाला जगाचा आत्मा म्हणून वर्णन केले आहे. ज्योतिषशास्त्र आणि पुराणांमध्ये सूर्याचा संबंध सूर्य देवाशी आहे. त्याचा जन्म पृथ्वीवर झाला असे म्हणतात. दुसऱ्या मान्यतेनुसार महर्षी कश्यप यांच्या पत्नी अदितीने कठोर तपश्चर्या केल्यावर एका आश्चर्यकारक मुलाला जन्म दिला. पुराणानुसार सूर्य देवानेच माता अदितीला तिच्या गर्भातून जन्म घेण्याचे वरदान दिले होते.

# सूर्य शांती : सूर्य ग्रहाला प्रसन्न करण्यासाठी ५ विशेष उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सूर्याच्या शांतीसाठी सकाळी अंघोळ केल्यानंतर सूर्यदेवाला जल अर्पित केले जाते. नंतर सूर्य संबंधित वस्तूंचे दान, जप, होम मंत्र धारण व सूर्याच्या वस्तूंनी जल स्नान करणे देखील सूर्याच्या उपायांपैकी आहे. सूर्याच्या शांतीसाठी या पाच विधींपैकी एक विधी उपयोगात आणता येऊ शकते. गोचरमध्ये सूर्याचे अनिष्ट प्रभाव दूर करण्यासाठी हे उपाय विशेष रूपात प्रभावी ठरू शकतात.

### १) स्नान द्वारे उपाय



गोचरमध्ये सूर्य अनिष्टकारक असल्यास जातकांनी स्नान करताना पाण्यात खसखस किंवा लाल फूल किंवा केशर मिसळून अंघोळ करणे शुभ ठरतं. खसखस, लाल फूल किंवा केशर या सर्व वस्तू सूर्याच्या कारक वस्तू आहे आणि सूर्याचे उपाय केल्याने अन्य अनिष्टापासून बचावासह जातक आजाराला सामोरा जाण्यास सक्षम होतो.

सूर्याचे उपाय केल्याने जातकाच्या वडिलांच्या आरोग्यात सुधार होण्याची शक्यता वाढते. सूर्याच्या वस्तूंनी स्नान केल्यावर सूर्याच्या वस्तूंचे गुण व्यक्तीच्या शरीरात प्रवेश करतात आणि त्याच्या शरीरात सूर्याच्या गुणांमध्ये वृद्धी करतात.

### २) दान



सूर्य वस्तूंनी स्नान करण्याव्यतिरिक्त सूर्य वस्तूंचे दान केल्याने देखील सूर्याच्या अनिष्टापासून वाचता येते. यात तांबा, गूळ, गहू, मसूर डाळ दान करता येते. हे दान प्रत्येक रविवारी किंवा सूर्य संक्रांतीच्या दिवशी करणे योग्य ठरते. सूर्य ग्रहणाच्या दिवशी देखील सूर्य वस्तूंचे दान करणे फायदेशीर ठरते. या उपाय अंतर्गत सर्व वस्तूंचे दान सोबत करता येऊ शकते. दान करताना वस्तूंचे वजन आपल्या सामर्थ्यानुसार करता येते. आपल्या संचित धनातून दान करणे अधिक योग्य ठरते. ज्या जातकानिमित्त दान केले जाते असेल ती व्यक्ती दान देण्यात सक्षम नसेल अर्थात वयाने लहान असल्यास किंवा इतर काही कारणामुळे त्या व्यक्तीच्या हाताने दान करणे शक्य नसल्यास कुटुंबातील जवळीक व्यक्ती त्या जातकाच्या निमित्ताने दान करू शकतात. दान करताना सूर्य देवावर पर्ण विश्वास आणि श्रद्धा असणे आवश्यक आहे. आस्था नसल्यास कोणत्याही उपायाचे पूर्ण शुभ फल प्राप्त होत नाही.

### ३) मंत्र जाप



सूर्य उपायांपैकी मंत्र जाप देखील एक उपाय आहे. सूर्य मंत्रांमध्ये ‘ॐ घृणिः सूर्य आदित्यः मंत्र’ जप केला जातो. या मंत्राचा जप दररोज करता येतो तसेच प्रत्येक रविवारी जप करणे विशेष शुभ प्रदान करणारे ठरते. दररोज जप करण्यासाठी मंत्रांची संख्या १०, २० किंवा १०८ असावी. मंत्रांची संख्या वाढवता देखील येऊ शकते तसेच सूर्य संबंधित इतर कार्य जसे हवनात या मंत्राचा जप करणे शुभ ठरते. मंत्राचा जप करताना व्यक्तीला शुद्धतेचे पूर्ण लक्ष ठेवणे गरजेचे आहे. मंत्र जपताना जातकांनी सूर्य देवाचे ध्यान करत राहावे. मंत्र जपताना एकाग्रता ठेवावी. यात मधून उठणे योग्य नाही.

### ४) सूर्य यंत्र स्थापना



सूर्य यंत्राची स्थापना करण्यासाठी सर्वात आधी तांब्याच्या पत्र किंवा भोजपत्रावर विशेष परिस्थितीत कागदावर सूर्य यंत्र निर्माण केले जाते. सूर्य यंत्रात समान आकाराचे ९ ब्लॉक तयार केले जातात. यात निर्धारित संख्या लिहिली जाते. वरील ३ खंडात ६, १, ८ संख्या क्रमशः वेगवेगळ्या खंडात असावी. मध्य भागात ७, ५, ३ संख्या लिहिल्या जातात आणि शेवटल्या खंडात २, ९, ४ लिहिले जाते. या यंत्राच्या संख्यांची विशेषता आहे की यांचा सम कोणत्याही खंडाशी केल्यास बेरीज १५ असेल. संख्या निश्चित वर्गात लिहिलेली असावी. तांब्याच्या पत्रावर कप्पे तयार करून संख्या लिहिणे किंवा भोजपत्रावर किंवा कागदावर लाल चंदन, केशर, कस्तुरी द्वारे खंड तयार करावे. डाळिंबाच्या लेखणीने खंड तयार करणे अधिकच उत्तम ठरेल. सर्व ग्रहांचे यंत्र तयार करण्यासाठी या वस्तूंनी आणि पदार्थांनी लेखन केले जाते.

### ५) सूर्य हवन करणे



सूर्य मंत्र हवनात प्रयोग करता येईल. हवन करण्यासाठी जाणकार पंडितांचा सल्ला घ्यावा. सूर्य कुंडलीत आरोग्य शक्ती व वडिलांचे कारक ग्रह असतात. जन्म कुंडलीत सूर्याचे दुष्प्रभाव प्राप्त होत असल्यास सूर्य राहू–केतूने पीडित असल्यास सूर्य संबंधित उपाय करणे फायदेशीर ठरते. विशेष म्हणजे हे उपाय सूर्य गोचरमध्ये शुभ फल देण्यात सक्षम नसल्यास यातून कोणताही उपाय करता येतो. या व्यतिरिक्त सूर्य गोचरमध्ये सहाव्या घराचा स्वामी किंवा सातव्या घराच्या स्वामीवर आपली दृष्टी टाकत त्याला पीडित करत असल्यास या उपायांनी कष्टांपासून मुक्ती मिळते.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**